
27-02-2025-Dai-01_DH_PAN_01_04_2016-1.qxp 02/26/2025 11:34 PM Page 1



आग्वाद किल्ल्यावर उभारणार 'कौशल्य विकास केंद्र'
पान ३ वर

आपलं, आपल्यासाठी, सर्वांसाठी

# दैनिक हेराल्ड

www.dainikherald.com



अफगाणिस्तानचा इंग्लंडवर रोमहर्षक विजय
पान ४ वर

वेर्णा, गुरुवार, २७ फेब्रुवारी २०२५ । पाने ४ । ₹ ४ | REG. NO. G2/RNP/GOA/101/2021-23 | Volume 13, Issue 175 | Verna, | facebook.com/dainikherald | Thursday 27 February 2025 | Pages 4 | ₹ 4

# चोपडेमधील 'झोन' बदलास उच्च न्यायालयाची स्थगिती

## १७(२) अंतर्गत भ्रष्टाचार झाल्याचा याचिकाकर्त्यांनी केला दावा | चोपडे गावाला मोठा दिलासा

■ टीम दैनिक हेराल्ड :

**पणजी, दि. २६ : पेडणे तालुक्यातील चोपडे गावातील वस्ती क्षेत्रात मोठ्या प्रमाणात वाढ करण्याच्या परवानगीला मुंबई उच्च न्यायालयाने बुधवारी स्थगिती दिली. न्यायालयाने नगर नियोजन कायद्याच्या कलम १७ अंतर्गत त्रुटी दुरुस्तीच्या माध्यमातून करण्यात आलेल्या १३० टक्के वाढीच्या निर्णयाला तात्पुरता आळा घातला आहे. या निर्णयामुळे चोपडे ग्रामस्थांना मोठा दिलासा मिळाला आहे.**

चोपडे येथील मयूर शेटगावकर, सीताराम राऊत, झेफेरिनो फर्नांडिस आणि शुभम सावंत यांनी प्रादेशिक योजनेतील सुधारणा आव्हान देत मुंबई उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल केली होती. याचिकाकर्त्यांनी नगरनियोजन कायद्याच्या कलम १७ (२) अंतर्गत दिलेल्या परवानग्या बेकायदेशीर असल्याचा दावा केला. त्यांनी सांगितले की, या परवानग्या गोवा टीसीपी कायदा १९७४ आणि भारतीय संविधानाच्या कलम १४, १९ व २१ च्या विरोधात असून त्या मनमानी व असंवैधानिक आहेत.

याचिकाकर्त्यांच्या वतीने ॲड. रोहित ब्रास दे सा यांनी न्यायालयात मांडलेल्या युक्तिवादात असे नमूद करण्यात आले की, मार्च २०२४ ते ऑक्टोबर २०२४ या कालावधीत गावाच्या भू-वापर नकाशात मोठे फेरबदल करण्यात आले. यामध्ये गावातील विद्यमान वस्ती क्षेत्राच्या तुलनेत १३० टक्के वाढ करण्यात आली. या परवानग्यांमुळे ३,६९,४८० चौरस मीटर क्षेत्राचा विकास आराखडा बदलला गेला आहे, त्यामुळे आगरवाडा-चोपडे गावाचा विद्यमान प्रादेशिक आराखडा २०२१ कालबाह्य ठरतो.गावातील नैसर्गिक आच्छादन, कमांड एरिया आणि बागांना वस्ती क्षेत्रात रूपांतरित करण्याचा आरोप याचिकाकर्त्यांनी केला. परिणामी, गावाच्या परिसंस्थेला कायमस्वरूपी हानी पोहोचण्याची भीती व्यक्त



करण्यात आली आहे. गावात बिबट्या आढळल्याचे दाखले देत, पर्यावरण-संवेदनशील क्षेत्रांचे वस्तीत रूपांतर हा वन्यजीव संरक्षण कायद्याच्या (१९७२) तरतुदींना धक्का देणारा निर्णय असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

याचिकाकर्त्यांनी आरोप केला की झोन बदल हे पूर्णपणे खाजगी हितसंबंधांसाठी करण्यात आले आहेत. एखादा पैसे देतो आणि इच्छित झोन मिळवतो या तत्वावर हे सगळे आधारित असल्याचे त्यांनी सांगितले. उदाहरणार्थ, सर्वेक्षण क्रमांक १७/१ च्या २,६४,१९७ चौरस मीटर पैकी १,९२,९५५ चौरस मीटर क्षेत्र तीन टप्प्यात वस्ती क्षेत्रात रूपांतरित करण्यात आले. यात बाग, कमांड एरिया, नैसर्गिक कव्हर आणि आपत्ती व्यवस्थापन क्षेत्राचाही समावेश आहे.माहिती अधिकार कायद्यांतर्गत प्राप्त माहितीनुसार, बंगळुरूस्थित ब्रह्म ॲग्रो टेरा प्रोजेक्ट्स लिमिटेडने सादर केलेल्या प्रस्तावाची शिफारस तज्ञ समितीने मूल्यांकन न करता मंजूर केली. यामध्ये वन विभागाचा अहवाल, साइट तपासणी आणि अभियंत्यांचा अभ्यास नसतानाही मंजुरी देण्यात आली. विशेष म्हणजे, १८ जुलै २०२४ रोजी विधानसभेत सादर केलेल्या बैठकीच्या इतिवृत्तानुसार, तज्ञ समितीने अर्जातील माहिती अपूर्ण असल्यामुळे निर्णय पुढे ढकलला होता. त्यामुळे नगरनियोजन कायद्याच्या कलम १७(२) अंतर्गत अर्ज हाताळताना मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार झाल्याचा आरोप याचिकाकर्त्यांनी केला आहे.न्यायालयाने तातडीने हस्तक्षेप करून सदर परवानगीला स्थगिती दिली आहे. पुढील सुनावणीत न्यायालय काय निर्णय घेते याकडे गावकऱ्यांचे लक्ष लागले आहे. दरम्यान, हा निर्णय ग्रामस्थांसाठी मोठा विजय मानला जात आहे, कारण यामुळे पर्यावरणीय समतोल राखण्यास मदत होणार आहे.

### टीसीपी कायद्याच्या कलम १७(२) वर न्यायालयाचा निकाल १३ मार्चला

**गोवा येथील मुंबई उच्च न्यायालयाने नगर नियोजन कायदा, १९७४ च्या कलम १७(२) वर दाखल झालेल्या अनेक जनहित याचिकांवरील सुनावणी पूर्ण केली आहे. या प्रकरणाचा एकत्रित अंतिम निकाल १३ मार्च रोजी जाहीर केला जाणार आहे. गोवा फाउंडेशन, गोवा खझान सोसायटी, गोवा बचाव अभियान आणि तीन स्थानिक नागरिक - प्रविणसिंग शेडगावकर (बेति), मयूर शेटगावकर (मोरजी) आणि स्वप्नेश शेर्लेकर (मुळगाव) यांनी या कलमाला आणि प्रादेशिक योजना २०२१ मधील त्रुटींना आव्हान देणाऱ्या याचिका दाखल केल्या होत्या. कलम १७(२) ची सुधारणा १ मार्च २०२३ रोजी करण्यात आली होती. या अंतर्गत, प्रादेशिक योजनेतील खाजगी भूखंडांचे तात्पुरते व मनमानी रूपांतरण वैयक्तिक अर्जांवर आधारित करण्यास परवानगी दिली जाते. याचिकाकर्त्यांनी हे कलम रद्द करण्याची मागणी केली आहे, कारण यामुळे नियोजन प्रक्रियेत अनियमितता येऊ शकते.**

## निवडक

### युपीत मोस्ट वॉन्टेड गुन्हेगाराचा खात्मा

**मेरठ, दि. २६ :** उत्तर प्रदेशमधील मेरठमध्ये बुधवारी पहाटे चकमक झाली. यामध्ये लॉरेन्स बिश्नोई टोळीचा गुंड जितेंद्र ऊर्फ जितू ठार झाला आहे. नोएडा पोलिसांच्या विशेष कृती दल (एसटीएफ) आणि स्थानिक पोलिसांनी संयुक्तपणे ही कारवाई केली. गाझियाबाद पोलिसांनी जितेंद्रवर १ लाख रुपयांचे बक्षीस जाहीर केले होते. तुरुंगातून पॅरोलवर बाहेर आल्यानंतर तो फरार झाला होता. त्याला न्यायालयाने जन्मठेपेची शिक्षा सुनावली होती.

मागील दोन वर्षांपासून फरार असलेल्या जितेंद्रने मेरठच्या मुंडली पोलिस स्टेशन परिसरात आश्रय घेतला असल्याची माहिती 'एसटीएफ'ला मिळाली. आज पहाटे एसटीएफ आणि स्थानिक पोलिसांनी परिसराला घेरले. जितेंद्रला आत्मसमर्पण करण्याचे आवाहन करण्यात आले; पण त्याने गोळीबार केला. पोलिसांनी प्रत्युत्तरादाखल केलेल्या गोळीबारात तो गंभीर जखमी झाला. त्याला रुग्णालयात नेले. रुग्णालयात उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला.

### राजौरीमध्ये लष्कराच्या वाहनावर हल्ला

**राजौरी, दि. २६ :** लष्कराच्या वाहनावर दहशतवादी हल्ला झाल्याची धक्कादायक माहिती समोर येत आहे. जम्मू-काश्मीरमधील राजौरी जिल्ह्यातील सुंदरबनी येथे लष्कराच्या वाहनावर दहशतवादी हल्ला झाला आहे. दहशतवाद्यांनी वाहनावर ४ ते ५ राउंड गोळीबार केला. या हल्ल्यातील जीवितहानीची माहिती अद्याप समोर आलेली नाही. मात्र, लष्कराच्या वाहनांवरील हल्ल्यानंतर दहशतवादी लपून बसल्याची माहिती समोर आली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, बुधवारी दुपारी १ वाजताच्या सुमारास दहशतवाद्यांकडून लष्कराच्या वाहनांवर हल्ला करण्यात आला. हा हल्ला राजौरी जिल्ह्यातील सुंदरबनी येथील फहल गावात पाण्याच्या टाकीजवळ झाला. हे गाव सुंदरबनी मल्ला रोडवर वसलेले आहे. या भागातून लष्कराचे एक वाहन जात होते. दरम्यान, दबा धरून बसलेल्या दहशतवाद्यांनी वाहनावर हल्ला केला. दहशतवाद्यांनी जंगलातूनच वाहनाला लक्ष्य करून अनेक गोळीबार केला. प्रत्युत्तरादाखल, लष्कराच्या जवानांनीही कारवाई केली आहे.

### देशात ११९ चिनी ॲप्सवर बंदी

**नवी दिल्ली, दि. २६ :** हिंदुस्थानात ११९ चिनी ॲप्सवर बंदी घालण्यात आली आहे. राष्ट्रीय सायबर सुरक्षा आणि सार्वभौमत्व या मुद्द्यांना डोळ्यांसमोर ठेवून केंद्र सरकारने हा निर्णय घेतला आहे. ज्या ११९ चिनी ॲप्सवर बंदी घातली आहे. ते सर्वच्या सर्व ॲप्स गुगल प्ले स्टोअरवर कार्यरत होते. केंद्र सरकारने हे सर्व ॲप्स तत्काळ गुगल प्ले स्टोअरवरून काढून टाकण्याचे आदेश दिले आहेत. यातील बहुतांश ॲप्स हे व्हिडीओ, व्हॉइस चॅट प्लॅटफॉर्म, चीन आणि हाँगकाँगच्या डेव्हलपर्सशी जोडलेले होते, असे सरकारने म्हटले आहे.

**हवामान**

कमाल : ३५ किमान : २८
आर्द्रता : ६८

**बाजार भाव**

सोने : ₹ ८९,७८० (१० ग्रॅम)
चांदी : ₹ १,००,५०० (१ किलो)

**शेअर मार्केट**

सेन्सेक्स : ८२,३६५.७७ ↑ (२३१.१६)
निफ्टी : २५,२३५.९० ↑ (८३.९५)

# मोले अभयारण्यातील भूसंपादनाला न्यायालयाचा ब्रेक

## दक्षिण पश्चिम रेल्वे आणि सर्वेक्षण व भूमी अभिलेख संचालनालयाला नोटीस

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**पणजी, दि. २६ :** मोले वन्यजीव अभयारण्य परिसरातील भूसंपादन प्रक्रियेवर आक्षेप घेत गोवा फाउंडेशनने दाखल केलेल्या जनहित याचिकेवर मुंबई उच्च न्यायालयाच्या गोवा खंडपीठाने दक्षिण पश्चिम रेल्वे आणि सर्वेक्षण व भूमी अभिलेख संचालनालय यांना नोटीस बजावली आहे.

कुळे गावातील भगवान महावीर (मोले) वन्यजीव अभयारण्याच्या हद्दीत होस्पेट-हुबळी-तीनाईघाट-वास्को रेल्वे मार्गाच्या दुहेरीकरणासाठी मोठ्या प्रमाणात भूसंपादन सुरू असल्याचा आरोप याचिकाकर्त्यांनी केला आहे. विशेषतः, सर्वोच्च न्यायालयाने २०२२ मध्ये या प्रकल्पासाठी दिलेल्या सर्व परवानग्या रद्द केल्या असतानाही भूसंपादन आणि जमीन महसूल नोंदींमध्ये बदल केले जात असल्याचा दावा करण्यात आला आहे. यामुळे वन्यजीव संरक्षण कायदा, १९७२ च्या तरतुदींचे उल्लंघन होत असल्याचे याचिकेत नमूद करण्यात आले आहे.

याचिकेत अभयारण्यात अतिक्रमण करण्यासाठी दक्षिण पश्चिम रेल्वेने दोन प्रकारच्या बेकायदेशीर प्रक्रिया राबवल्याचा आरोप आहे. यातील पहिली प्रक्रिया म्हणजे रेल्वे कायद्यांतर्गत नियम डावलून भूसंपादन करण्यात आल्याचा दावा करण्यात आला आहे. तसेच २०२४ मध्ये कुळे गावातील सर्वेक्षण क्रमांक १६५/१ तयार करण्यात आला. या नोंदीनुसार, विद्यमान रेल्वे ट्रॅकच्या संपूर्ण लांबीसह दोन्ही बाजूंना मोठ्या प्रमाणात जमीन समाविष्ट करण्यात आली आहे, ज्यामुळे अभयारण्याचा महत्त्वाचा भाग दक्षिण पश्चिम रेल्वेच्या अखत्यारीत जात आहे. विशेष म्हणजे, या नव्या सर्वेक्षण क्रमांकाखाली मोठ्या संख्येने झाडे तोडण्याचे नियोजन असल्याचे याचिकेद्वारे अधोरेखित करण्यात आले आहे.

याचिकेत दक्षिण पश्चिम रेल्वे आणि सर्वेक्षण व भूमी अभिलेख संचालनालय यांना अभयारण्यातील जमिनी संपादित करण्याचा किंवा त्या संदर्भात कोणतेही आदेश पारित करण्याचा अधिकार नाही, असे सांगण्यात आले आहे. तसेच, वन्यजीव संरक्षण कायद्याच्या तरतुदींनुसार हे आदेश अवैध ठरतात, असा मुद्दा उपस्थित करण्यात आला आहे.

सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाचे उल्लंघन आणि अभयारण्यातील अतिक्रमण रोखण्याच्या मागणीसंदर्भात न्यायालयाने पुढील सुनावणी ४ मार्च रोजी ठेवली आहे. यावेळी अभयारण्याच्या हद्दीत झाडांची तोड थांबवण्यासंबंधीच्या आदेशावरही सुनावणी होणार आहे.

# पुण्यात बसस्थानकात बसमध्ये तरुणीवर बलात्कार

**पुणे, दि. २६ :** पुण्यातील प्रचंड गजबजलेल्या स्वारगेट बस स्थानकात एका २६ वर्षीय तरूणीवर बलात्कार झाल्याची दुर्दैवी घटना बुधवारी घडली आहे. या घटनेने पुणे शहराबरोबर संपूर्ण महाराष्ट्र हादरले आहे. सकाळी साडेपाचच्या सुमारास ही घटना घडली. पोलिसांनी आरोपीचे नाव निष्पन्न केले असून त्याचा शोध घेण्यास पोलिसांची आठ पथके रवाना झाली आहेत. दत्तात्रय रामदास गाडे (वय ३५,, रा. शिक्रापूर) असे आरोपीचे नाव आहे. त्याच्याविरुद्ध जबरी चोरीचे दोन गुन्हे दाखल आहेत.

याबाबत पुणे पोलीस उपायुक्त स्मार्तना पाटील यांनी सांगितले की, पीडित २६ वर्षाची तरुणी फलटणला जाण्यासाठी पहाटे साडेपाच वाजण्याच्या सुमारास स्वारगेट बसस्थानकावर आली. तिला एकाने फलटणला जाणारी गाडी इकडे लागत नाही. तिकडे लागते, असे सांगितले. त्यावर या तरुणीने इकडेच फलाटावर लागते, असे सांगितले. त्यावर त्याने तिच्याशी गोड बोलून तिला मी १० वर्षे इथे आहे. तिकडे लागणारी बसच फलटणला जाते, असे सांगून तिला आडबाजूला उभ्या असलेल्या शिवशाही बसमध्ये नेले. बसमध्ये अंधार होता. तेव्हा त्याने तुम्ही दरवाजा उघडून आत जा, असे सांगितले. तेव्हा ही तरुणी बसमध्ये गेली. तेव्हा तिच्या मागोमाग तो आत आला. त्याने दरवाजा लावून घेत तिच्यावर बलात्कार केला. या घटनेनंतर ही तरुणी फलटणला जाण्यास निघाली. अर्ध्या वाटेवरुन ती परत आली आणि तिने स्वारगेट पोलिस ठाण्यात या घटनेची माहिती दिली स्वारगेट पोलिसांनी तातडीने तेथील सीसीटीव्ही चित्रीकरण तपासले. चित्रीकरणात आरोपी निष्पन्न झाला आहे. त्याच्यावर पुणे ग्रामीण पोलिसांमध्ये जबरी चोरीचे दोन गुन्हे दाखल आहेत.

# शनिवारी काम करणाऱ्यांना भरपाई रजा देण्याचे मानवाधिकार आयोगाचे आदेश

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**पणजी, दि. २६ :** गोवा मानवाधिकार आयोगाने उत्तर गोवा जिल्हाधिकाऱ्यांना निर्देश दिले आहेत की, शनिवारी कार्यालयात उपस्थित राहणाऱ्या कर्मचाऱ्यांना भरपाई रजा नाकारण्याचा आदेश मागे घ्यावा. हा निर्णय केंद्रीय नागरी सेवा नियमांचे उल्लंघन टाळण्यासाठी घेण्यात आल आहे.

आयोगाने स्पष्ट केले की केंद्रीय नागरी सेवा नियमांनुसार, राजपत्रित अधिकाऱ्यांना वगळता इतर सरकारी कर्मचाऱ्यांना सुट्टीच्या दिवशी काम केल्यास नियमानुसार भरपाई रजा द्यावी लागते. ही रजा साधारणतः एका महिन्याच्या आत घ्यावी लागते.

उत्तर गोवा जिल्हाधिकारी कार्यालय आणि बार्देश , पेडणे , तिसवाडी, डिचोली आणि सत्तरी तालुक्यांतील मामलतदार कार्यालयांमधील काही कर्मचाऱ्यांनी अन्यायकारक वागणुकीबाबत आयोगाकडे तक्रार दाखल केली होती. १८ डिसेंबर २०२४ रोजी दाखल करण्यात आलेल्या या तक्रारीत शनिवारी काम करण्यास भाग पाडण्यात येत असून, त्याची कोणतीही भरपाई दिली जात नसल्याचा आरोप करण्यात आला होता.

३० ऑक्टोबर २०२४ रोजी उत्तर गोवा जिल्हाधिकारी स्नेहा गित्ते यांनी महसूल न्यायालयातील प्रलंबित प्रकरणांच्या सुनावणीसाठी कर्मचाऱ्यांना शनिवारी कार्यालयात उपस्थित राहण्याचे आदेश दिले होते. मात्र, यासंदर्भात कोणतीही भरपाई रजा दिली जाणार नाही, असेही स्पष्ट करण्यात आले होते. हा निर्णय कायद्याचे उल्लंघन असल्याचे आयोगाने नमूद केले आहे.

आयोगाने केंद्रीय नागरी सेवा (रजा) नियम १९७२ च्या तरतुदींचा संदर्भ घेतला. या नियमांनुसार, सरकारी कर्मचाऱ्यांना सुट्टीच्या दिवशी काम केल्यास ओव्हरटाईम वेतन किंवा भरपाई रजा दिली पाहिजे. तसेच, भारत सरकारच्या अर्थ मंत्रालयाच्या ११ ऑगस्ट १९७६ रोजीच्या कार्यालयीन ज्ञापनातही यासंदर्भात स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत.

याशिवाय, मुंबई उच्च न्यायालयाच्या गोवा खंडपीठाने ३१ मार्च २०२३ रोजी दिलेल्या आदेशातही महसूल विभागाच्या १४ सप्टेंबर २०२२ च्या निर्देशांची काटेकोर अंमलबजावणी करण्याचे निर्देश दिले होते. तथापि, उच्च न्यायालयाने कर्मचाऱ्यांना भरपाई रजा न देण्यासंदर्भात कोणतेही निर्देश दिले नव्हते.आयोगाने स्पष्ट केले की, जिल्हाधिकाऱ्यांनी ३० ऑक्टोबर २०२४ रोजी जारी केलेल्या कार्यालयीन ज्ञापनातील कोणतीही भरपाई रजा दिली जाणार नाही' हा भाग मागे घ्यावा, कारण तो कर्मचाऱ्यांच्या हक्कांचे उल्लंघन करणारा आहे. तसेच, भारत सरकारच्या नियमावलींनुसार सुधारित आदेश जारी करण्याची शिफारस करण्यात आली आहे.

# दाबोळी विमानतळावरील व्यावसायिक उड्डाणे संकटात

## विमानतळ बंद पडण्यासाठीच उड्डाणपुलाच्या खांबांची ऊंची वाढवली ?

ऑगस्टो रॉड्रिग्ज
टीम दैनिक हेराल्ड

**वास्को, दि. २६ :** झुआरीनगर ते बोगमाळे या चार पदरी उड्डाणपुलाच्या प्रस्तावित प्रकल्पामुळे भारतीय नौदलाच्या ना हरकत प्रमाणपत्रावर (एनओसी) अवलंबून दाबोळी आंतरराष्ट्रीय विमानतळावरील व्यावसायिक उड्डाणांचे भवितव्य ठरणार आहे. या प्रकरणामुळे दक्षिण गोव्यातील नागरिकांच्या उपजीविकेच्या संधींवरही परिणाम होण्याची शक्यता आहे.

नॅशनल हायवे अथॉरिटी ऑफ इंडिया (एनएचएआय) कडून उड्डाण पुलाचे काम सुरू करण्यात आले असले तरी, त्यातील काही भाग ऑब्स्टॅकल लिमिटेशन सरफेसेस (ओएलएस) अंतर्गत येतो. भारतीय नौदलाची एनओसी मिळाली नाही तर हा प्रकल्प आंतरराष्ट्रीय नागरी विमान वाहतूक संघटना



(आयसीएओ) च्या निकषांचे उल्लंघन करतो, असे तज्ज्ञांचे म्हणणे आहे.

नागरी विमान वाहतूक मंत्रालयाच्या ३० सप्टेंबर २०१५ रोजीच्या अधिसूचनेच्या अन्वये, संरक्षण मंत्रालयाच्या परवानगीशिवाय अशा प्रकल्पांना मान्यता देता येत नाही. परिशिष्ट १४ मध्ये नमूद केल्यानुसार, कमाल परवानगीयोग्य उंचीच्या मर्यादा निश्चित केल्या आहेत. सध्या प्रस्तावित उड्डाणपुलाचे खांब सुमारे २०.८ मीटर उंच असून, विमानाच्या सुरक्षित लँडिंगसाठी कमाल परवानगीयोग्य उंची ९ मीटर इतकी आहे. यामुळे दाबोळी विमानतळाच्या उड्डाणांना अडथळा येण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

निवृत्त नौदल अधिकारी कमांडर अतुल पंत यांनी यासंबंधी चिंता व्यक्त केली आहे. उड्डाणपुलाच्या उंचीमुळे दाबोळी विमानतळाच्या कार्यक्षमतेवर मोठा परिणाम होऊ शकतो. हा पुल १.८ ते २.२ किमीच्या अंतरावर असून, त्यामुळे दाबोळी विमानतळाच्या भवितव्यावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे, असे ते म्हणाले. याच संदर्भात, एका अभियंत्याने नाव न सांगण्याच्या अटीवर सांगितले की, नौदलाने चार वेळा आक्षेप घेतला असतानाही एनएचएआयला परवानगी देण्यात आली, हे सरकारच्या नियोजनावर प्रश्नचिन्ह निर्माण करते.

दाबोळी विमानतळ बंद होणार नाही, असे सरकारतर्फे वारंवार सांगण्यात येते. मात्र, काही तज्ज्ञ आणि स्थानिक व्यावसायिक यावर विश्वास ठेवायला तयार नाहीत. एक निवृत्त सरकारी अधिकारी म्हणाले, दिल्लीतील उच्चस्तरीय दबाव नौदलावर टाकला जाऊ शकतो, पण देशहित महत्त्वाचे आहे. दरम्यान, दाबोळी विमानतळावरील व्यावसायिक उड्डाण बंद करून मोपा विमानतळ व त्याच्या आसपासच्या व्यवसायांना चालना देण्याचा हा प्रयत्न असल्याचा आरोप केला जात आहे. एका खासदाराने सांगितले की, मोपा विमानतळाच्या आसपास कॅसिनो चालक आणि हॉटेल व्यावसायिकांनी मोठ्या प्रमाणात जमिनी खरेदी केल्या आहेत. सरकार दाबोळी विमानतळ बंद करण्याच्या दिशेने प्रयत्न करत आहे.

एअरपोर्ट अथॉरिटी ऑफ इंडियाच्या आकडेवारीनुसार, २ एप्रिल २०२४ ते १५ फेब्रुवारी २०२५ या कालावधीत ७.३३ दशलक्ष प्रवाशांनी दाबोळी विमानतळाचा वापर केला आहे. आगामी काळात हा आकडा आठ दशलक्षांपेक्षा अधिक जाण्याची शक्यता आहे.

दक्षिण गोव्यातील व्यापारी आणि स्थानिक रहिवासी न्यायालयाच्या निर्णयाची वाट पाहत आहेत. एका व्यावसायिकाने सांगितले, आमचा पारंपरिक कौटुंबिक व्यवसाय धोक्यात आला आहे. सरकारने जर दाबोळी विमानतळ बंद करायचे नसेल, तर नौदलाच्या परवानगीशिवाय हा उड्डाणपूल कसा मंजूर करण्यात आला ? जर सरकारला खरोखरच दाबोळी विमानतळ सुरू ठेवण्याची इच्छा असेल, तर एनएचएआयला या उड्डाणपुलाचा फेरआढावा घेण्याचे आदेश द्यावे लागतील. अन्यथा, दक्षिण गोव्यातील नागरिकांचा विरोध उग्र स्वरूप धारण करू शकतो.